| MHPU240021532022 | **फौ. कि. अर्ज क्र. २८७/२०२२**<br>**सायली भापकर**<br>विरुद्ध<br>**अजित भापकर व इतर** |
| --- | --- |

## निशाणी क्र.०५ वरील आदेश

सदरचा अर्ज महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण करणारा अधिनियमाच्या तरतुदीनुसार अंतरिम आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**०२.** अर्जदाराने मुळ अर्ज महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण करणारा अधिनियमाच्या कलम १२ प्रमाणे दाखल केला आहे व त्यामध्ये कलम १८, १९, २०, २२ व २३ प्रमाणे आदेशांची मागणी केली आहे.

**०३.** सदरच्या अर्जात अर्जदाराचे कथन आहे की, अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांचा विवाह दि.२६/११/२०१८ रोजी व्यंकटेश विवाह संस्था, मंचर, ता. आंबेगांव, जि. पुणे येथे हिंदु धर्मशास्त्र रितीरिवाजाप्रमाणे झाला. सदरचा विवाह हा अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांच्या प्रेमसंबंधातुन झाला आहे. जाबदेणार क्र.२ हे अर्जदाराचे सासरे आहेत व जाबदेणार क्र.३ ही अर्जदाराची सासु आहे. लग्नानंतर, अर्जदार ही जाबदेणार यांचेकडे मौजे वळती, ता. आंबेगांव, जि. पुणे येथे नांदावयास गेली. जाबदेणार यांनी अर्जदारास काही दिवसच व्यवस्थित नांदवले. त्यानंतर, जाबदेणार क्र.१ ते ३ यांनी अर्जदार हिस त्रास देण्यास सुरुवात केली. जाबदेणार हे अर्जदार हिला किरकोळ कारणांवरुन टोचुन बोलत, तसेच, शिवीगाळ करत. परंतु, अर्जदार ही तिच्या परीने सर्वांना सुखी ठेवण्याचा प्रयत्न करत होती. परंतु, जाबदेणार हे अर्जदार हिचा पदोपदी अपमान करत असत. जाबदेणार यांनी अर्जदार हिला काही दिवस व्यवस्थित नांदवल्यानंतर ते अर्जदार हिचा मानसिक व शारीरीक छळ करु लागले. अर्जदार हिला रोजंदारीवर कामास पाठवित असत. जाबदेणार हे अर्जदार हिचेकडुन सदर कामाचा आलेला पगार घेत असत व तिला

खर्चासाठी पैसे देत नसत. घरातील सर्व कामे करुन अर्जदार ही रोजंदारीने कामास जात असे.

०४. जाबदेणार हे अर्जदार यांचे फेसबुक अकाउंट चालवित असत व सदर अकाउंटवरुन दुस—या मुलांशी चॅटींग करत असत. त्यावरुन, अर्जदार हिचेवर संशय घेउन तिला मारहाण करत असत. जाबदेणार यांना दारुचे व्यसन असल्यामुळे ते रोज संध्याकाळी दारु पिउन भांडण करत असत व अर्जदार हिला मारहाण करत असत. जाबदेणार हे नशेच्या गोळया घेउन नशा करत असत. जाबदेणार क्र.१ यांना अनेक व्यसने असल्यामुळे ते व्यवसायदेखील सांभाळत नाहीत. अर्जदार हिने जाबदेणार क्र.१ यांचेशी प्रेमविवाह केलेला असल्याने ती तिचे आईवडिलांना काहीही न सांगता सर्व त्रास सहन करत होती. अर्जदार ही गरोदर राहिल्यानंतरदेखील जाबदेणार यांनी तिला अधिकच त्रास देण्यास सुरुवात केली. अर्जदार ही गरोदर असतांनादेखील घरातील सर्व कामे करत असे. परंतु, जाबदेणार यांनी तिला त्रास देणे चालुच ठेवले. जाबदेणार क्र.१ हे अर्जदार हिचेवर संशय घेउन तिचा मानसिक व शारीरीक छळ करत असत व जाबदेणार क्र.२ व ३ हे त्यास दुजोरा देत असत.

०५. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, दि.२५/१०/२०१९ रोजी अर्जदार हिला मुलगी झाली. त्यामुळे, जाबदेणार यांच्या वागण्यात फरक पडेल असे अर्जदारास वाटले. परंतु, जाबदेणार क्र.२ व ३ हे त्यांना मुलगा हवा होता या कारणावरुन मानसिक व शारीरीक त्रास देउ लागले. त्यानंतरदेखील जाबदेणार हे अर्जदार हिचेवर संशय घेउन तिला आजुबाजूच्या लोकांशी बोलु देत नसत. जाबदेणार हे अर्जदार हिला माहेरी जाउ देत नसत व धमक्या देत असत. जाबदेणार क्र.१ हे अर्जदार हिला माहेरहुन व्यवसायासाठी पैसे घेउन येण्यासाठी तगादा लावत. जाबदेणार यांनी त्यांचे कर्ज फेडण्यासाठी अर्जदार हिला मारहाण करुन तिच्या गळयातील मंगळसूत्र हिसकावुन घेतले व ते गहाण ठेवले. तसेच, जाबदेणार क्र.२ व ३ हे देखील अर्जदार हिला टोमणे मारुन 'तू तुझे माहेरी जाउन रहा' असे म्हणुन शिवीगाळ व मारहाण करत असत. अर्जदार ही आजारी असतांनादेखील जाबदेणार

हे तिला दवाखान्यात घेउन गेले नाही. आजार असहय झाल्यामुळे ती माहेरी गेली व तिच्या आईवडिलांनी तिला दवाखान्यात नेले. त्यानंतर, अर्जदार ही पुन्हा सासरी गेल्यानंतर जाबदेणार हे परत सासरी आल्याच्या कारणावरुन अर्जदार हिला त्रास देउ लागले. त्यानंतर, जाबदेणार क्र.२ यांनी अर्जदार हिला शिवीगाळ केली व घराबाहेर काढले. त्यानंतर, अर्जदार ही नाईलाजास्तव तिच्या माहेरी गेली. त्यानंतर, जाबदेणार यांनी अर्जदार हिला फोन करुन 'लगेच माहेरी ये नाही तर तुझे आईवडिलांना मारहाण करेन नाहीतर मी स्वत:च्या जीवाचे बरेवाईट करुन तुला व तुझे आईवडिलांना खोटया केसमध्ये गुंतवेन' अशी धमकी दिली. त्यावेळी, अर्जदार ही आजारी असल्याने सासरी गेली नाही. त्यावेळी, जाबदेणार क्र.१ याने औषध पिण्याचे नाटक केले.

**०६.** जाबदेणार यांनी अर्जदारास शिवीगाळ व मारहाण करुन तिला सांसारीक सुखापासून वंचित ठेवले आहे. अर्जदार हिचे पालनपोषण करण्याची जबाबदारी जाबदेणार यांची आहे. परंतु, त्यांनी सदरची जबाबदारी नाकारल्याने अर्जदार हिने नाईलाजास्तव प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. जाबदेणार यांना शेतीतुन पाच ते आठ लाखांचे उत्पन्न मिळते. जाबदेणार क्र.१ याला भाजीपाल्याच्या व्यवसायातुन रु.३०,०००/— ते रु.४०,०००/— इतका नफा मिळतो. जाबदेणार यांची परिस्थिती चांगली असुन अर्जदारास दरमहा रु. १०,०००/— पोटगी देण्याची त्यांची ऐपत आहे. सबब, मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत अर्जदार हिस दरमहा रु.८,०००/— इतकी पोटगी मंजुर करण्याची विनंती केली.

**०७.** जाबदेणार क्र.१ ते ३ यांनी निशाणी क्र.१२ प्रमाणे त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी अर्जदारासोबतचे नातेसंबंध मान्य करुन इतर मजकुर नाकारलेला आहे. जाबदेणार यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार ही जाबदेणार यांचेकडे काही दिवसच नांदली. त्यानंतर, ती घरातील दैनंदिन कामे करण्यास टाळाटाळ करु लागली. अर्जदार ही नेहमी उशीरा उठत असे व घरातील कामे न करता झोपुन राहत असे. त्यामुळे, घरातील सर्व कामे जाबदेणार क्र.१ यांची

आई करत असे. अर्जदार ही किरकोळ कारणावरुन जाबदेणार यांचेशी भांडण करत असे. परंतु, संसार व्हावा यासाठी जाबदेणार हे प्रयत्न करत होते. अर्जदार ही जाबदेणार यांचे काहीही ऐकत नसे व जाबदेणार यांना मानसिक त्रास देत असे. अर्जदार ही गरोदर राहिल्यानंतर जाबदेणार क्र.१ हे तिची वेळोवेळी तपासणी करुन औषधोपचार घेत होते. जाबदेणार क्र.३ हया घरातील सर्व कामे पार पाडत होत्या. परंतु, अर्जदार हिचे वागण्यावर कोणताही परिणाम झाला नाही.

०८. मुलगी आरोहीच्या जन्मानंतर अर्जदार हिचे वागण्यात बदल होईल असे जाबदेणार यांना वाटले होते. परंतु, अर्जदार हिच्या वागण्यात फरक पडला नाही. त्यानंतर, अर्जदार हिने विनाकारण भांडण करुन जाबदेणार यांना त्रास देण्यास सुरुवात केली. जाबदेणार यांनी अर्जदार हिच्या बाळंतपणाचा खर्च केलेला आहे. अर्जदार हिच्या माहेरकडील लोक अर्जदार हिला पाहण्यासाठीदेखील आले नव्हते. मुलगी आरोही हिच्या जन्मानंतर अर्जदार ही नेहमीप्रमाणे तासन्तास मोबाईलवर कोणाशी तरी एस.एम.एस. द्वारे चॅटींग करत असे. जाबदेणार यांनी तिला समजावुन सांगितले असता अर्जदार हिने माहेरी जाण्याची व घटस्फोटाची धमकी दिली. जाबदेणार यांनी अर्जदार हिचेकडे पैशांची मागणी केली नव्हती. अर्जदार ही माहेरी निघुन गेल्यानंतर जाबदेणार यांनी अर्जदार ही नांदण्यास येण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. परंतु, अर्जदार ही सासरी आल्यानंतर तिने जाबदेणार यांना पुन्हा शारीरीक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. त्यानंतर, जाबदेणार यांनी अर्जदार हिला समजावुन सांगितले असता ती तिला संसार करायचा नाही असे सांगुन घरातील कपडेलत्ते दागदागिने घेउन व लहान मुलीला सोडुन स्वत:हुन माहेरी निघुन गेली आहे.

०९. जाबदेणार यांचे पुढे असे कथन आहे की, जाबदेणार क्र.१ यास अर्जदार हिचेसोबत राहण्याची ईच्छा असुनही त्यांना विभक्त राहावे लागत आहे. जाबदेणार हे मुलगी आरोही हिचा सांभाळ करत आहेत. अर्जदार ही माहेरी गेल्यापासुन मुलीला भेटण्यासाठीसुद्धा आलेली नाही. अर्जदार हिने स्वत:हुन जाबदेणार क्र.१ व मुलगी आरोही यांचा त्याग केलेला आहे. अर्जदार हिच्या

माहेरची परिस्थिती चांगली असुन ती स्वतः उच्चशिक्षीत आहे. ती उत्तमप्रकारे नोकरी करुन कमावु शकते. अर्जदार हिच्या वडिलांना शेतीतुन आठ ते दहा लाख इतके उत्पन मिळते. अर्जदार हिच्या वागण्यामुळे जाबदेणार यांच्या मानसिकतेवर परिणाम झाला असल्याने ते कोणत्याही प्रकारचे काम करण्यास सक्षम राहिलेले नाहीत. जाबदेणार क्र.२ व ३ हे वयस्कर आहेत. जाबदेणार क्र.१ यांचेवर आईवडिल व लहान मुलीच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे. सबब, अर्जदार हिचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**१०.** अर्जदार व जाबदेणार यांचेतर्फे त्यांचे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. माझे विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे :

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार जाबदेणार यांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी शाबीत करते काय? | **होय.** |
| २. | अर्जदार जाबदेणार क्र.१ याचेकडून आर्थिक साहाय्य मिळणेस पात्र आहे काय? असल्यास किती? | **होय. रक्कम रु. २,०००/— प्रतिमहा** |
| ३. | काय आदेश ? | **अंशतः मंजूर** |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुद्दा क्र.१ व २ करीता</u> :**

(पुनरावृत्ती टाळण्याचे उद्देशाने या ठिकाणी मुद्दा क्र.१ व २ एकत्रित विचाराधीन घेतलेले आहेत.)

**११.** अर्जदाराने अर्जातील कथनाच्या पुष्ट्यर्थ शपथपत्र दाखल केले आहे. त्यावरुन असे दिसते की, अर्जदाराने सदरच्या अर्जाद्वारे केलेल्या मागण्या व मुळ अर्जातील मागण्या सारख्या आहेत. तसेच, अभिलेखावर दाखल असलेल्या नि.क्र.११ वरील कौटुंबिक हिंसाचार अहवालाचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी

अर्जदाराच्या कथनांना पुष्टी मिळते. जाबदेणार क्र.१ याने अर्जदार हिचे अर्जातील कथन नाकारले असले तरी त्याबाबत दोन्ही बाजुंचा पुरावा येणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत, अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा कायदा कलम १३ प्रमाणे अंतरिम आदेश पारित करता येतो. जाबदेणार क्र.१ याने अर्जदार ही स्वत:हून माहेरी राहत असल्याचे कथन केलेले असले तरी अर्जदाराने स्वत: जाबदेणार यांचा त्याग केला किंवा कसे ही बाब दोन्ही बाजूंचा पुरावा घेवून गुणवत्तेवर ठरविणे आवश्यक आहे. परंतु, सकृतदर्शनी अर्जदार ही जाबदेणार क्र.१ पासुन स्वतंत्र राहत असुन जाबदेणार क्र.१ ने तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही काळजी घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे, अशा परिस्थितीत मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत आर्थिक लाभाचा आदेश करणे उचित होईल. आर्थिक लाभाचा आदेश पोटगीच्या स्वरुपात करता येईल. अर्जदार व जाबदेणार क्र.१ एकत्र राहत नाहीत. अर्जदार हि तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांचा विवाहसंबंध अद्याप कायम आहे. त्यामुळे, कोणत्याही परिस्थितीत अर्जदाराचा सांभाळ करण्याची नैतिक जबाबदारी जाबदेणार क्र.१ याची आहे. परंतु, अर्जदाराने जाबदेणार यांचेविरुद्ध केलेले आरोप, तसेच अर्जदार ही माहेरी राहत असतांना तिच्या उदरनिर्वाहाकरीता जाबदेणार क्र.१ याने प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. हे पाहता, जाबदेणार यांनी निश्चितच अर्जदाराची जबाबदारी टाळल्याचे दिसून येते.

**१२.** जाबदेणार क्र.१ याने त्याला वडिलोपार्जित शेती असल्याचे नाकारलेले आहे. तसेच, जाबदेणार क्र.१ याने नि.क्र.१४ अन्वये दाखल केलेल्या मालमत्ता आणि जबाबदारी चे प्रतिज्ञापत्रामध्ये त्याचे उत्पन्न स्थिर नसुन त्यास दरमहा अंदाजे रु.१२,०००/— इतके उत्पन्न मिळत असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच, त्याचेवर कोणत्याही बॅकेचे कर्ज असल्याचे दिसून येत नाही. तथापि, जाबदेणार यांचे नावे कोणतीही जमीन मिळकत नसल्याचे दिसुन येते. अर्जदाराने नि.क्र.१३ अन्वये दाखल केलेल्या मालमत्ता आणि जबाबदारीचे प्रतिज्ञापत्रात तिने तिचे शिक्षण इयत्ता बारावीपर्यंत झाले असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच, जाबदेणार क्र.१ यास मासिक रु.३०,०००/— ते ४०,०००/— इतके उत्पन्न असल्याचे तसेच, शेतीतुन

रु.५ लाख ते रु.८ लाख उत्पन्न असल्याचे नमुद केले आहे. तसेच, मुलगी आरोही ही जाबदेणार क्र.१ यांचे ताब्यात असल्याचे नमुद केले आहे. अर्जदार हिने जाबदेणार यांना ५ ते १० एकर बागायती शेती असल्याचे व त्यातुन त्यांना रु.५ ते ८ लाख उत्पन्न मिळत असल्याचे नमुद केले आहे. सदर कथनाचे पुष्ट्यर्थ अर्जदार हिने नि.क्र.३ सोबत गट क्र.८७२ व ८६४ या मिळकतींचे सातबारा उतारे दाखल केलेले आहेत. सदर सातबारा उता—यांचे अवलोकन केले असता जाबदेणार क्र.२ चंद्रकांत भापकर यांचे नावे अनुक्रमे १४ गुंठे व ४० गुंठे इतकी जमीन असल्याचे दिसुन येते. परंतु, अर्जदार हिने जाबदेणार यांच्या तरकारी व्यवसायाबाबत कोणतेही कागदपत्रे दाखल केलेले नाहीत. तसेच, अर्जदार हिने जाबदेणार क्र.१ यास सदर व्यवसायातुन मासिक रु.३०,०००/— ते ४०,०००/— इतके उत्पन्न मिळत असल्याचे नमुद केले असले तरी त्याबाबत पुरावा येणे आवश्यक आहे.

**१३.** जाबदेणार क्र.१ हा शारिरीकदृष्टया सक्षम असल्याचे त्याने नाकारलेले नाही. जाबदेणार क्र.१ याने त्यास शेतीतुन रु.१२,०००/— इतके उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले आहे. तसेच, त्याचेवर आईवडिल व मुलगी आरोही हिची जबाबदारी असल्याचे कथन केले आहे. असे जरी असले तरी, जाबदेणार क्र. १ यास अर्जदार हिची जबाबदारी टाळता येणार नाही. अशा परिस्थितीत, जाबदेणार क्र.१ याचे उत्पन्नाचा व राहणीमानाचा विचार करता प्रथमदर्शनी तो अर्जदार हिस दरमहा रक्कम रु.२,०००/— इतकी पोटगी देण्यास समर्थ असल्याचे दिसुन येते. अशा परिस्थितीत, अर्जदाराच्या दैनंदिन गरजा, तसेच राहणीमान पाहता, जाबदेणार क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रु.२,०००/— इतकी रक्कम अंतरिम पोटगी म्हणुन प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत देण्याचा आदेश करणे न्यायोचित होईल. यावरुन, अर्जदाराचा अर्ज अंशत: मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दे क्र.१ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येते व मुद्दा क्र.३ करीता पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज निशाणी क्र.०५ अंशत: मंजूर करण्यात येत आहे

२. जाबदेणार क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.२,०००/— अंतरिम पोटगी म्हणुन अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत नियमितपणे द्यावी.

३. आदेशाची प्रत संरक्षण अधिकारी, अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांना विनामूल्य देण्यात यावी.

**(आदेश खुल्या न्यायदान कक्षात सांगितला व अधिघोषित केला.)**

MEGHA SHASHIKANT MALI
Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2024.09.20 18:14:56 +0530

**(श्रीमती एम. एस. माळी)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
घोडेगांव, जि. पुणे.

स्थळ : घोडेगांव
दि.:१०/०९/२०२४